Total No. of Pages : 3

| Seat No. | |
|---|---|

# B.A. (Part - I) (Semester - I) Examination, March - 2018

## MARATHI (Optional) (Paper -I)

## अभिरूची

## Sub. Code : 58441

Day and Date : Thursday, 22 - 03 - 2018 Total Marks : 50

Time : 12.00 noon to 02.00 p.m.

सूचना:- 1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

2) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

प्र.1) योग्य पर्याय निवडा. [10]

i) 'साहित्य आणि संस्कृती' हा लेख कुणी लिहिला आहे?

अ) दिंगबर पाध्ये ब) भालचंद्र नेमाडे

क) गो. मा. पवार ड) श्री. व्यं. केतकर

ii) भाषेमध्ये अधिक महत्त्व कशाला असते?

अ) बोलणे ब) ग्रंथनिर्मिती करणे

क) लिहिणे ड) पाठांतर करणे

iii) गो. मा. पवार यांच्या मते कोणते लेखक अव्वल दर्जाचे ग्रामीण लेखक ठरतात?

अ) भाऊ पाध्ये ब) आनंद यादव

क) व्यंकटेश माडगूळकर ड) ना. सी. फडके

iv) चाक पंक्चर होण्याच्या प्रसंगावरून आनंद यादवांना कोणती कथा सुचली?

अ) चक्रव्यूह ब) गोंधळात गोंधळ

क) पाठलाग ड) धुणं

v) 'कथेची बीजधारणा' या लेखात आनंद यादवांनी कोणत्या गोष्टीचा शोध घेतला आहे?

अ) लेखकाला मिळणारे मानधन ब) कथा कशी सूचते

क) लेखकाची अभ्यासिका ड) कथाकथनाची तंत्रे

vi) अनुभवाशी प्रामाणिक राहण्यासाठी कवीजवळ कोणती गोष्ट आवश्यक असते?

अ) आत्मभान  ब) भावविवशता

क) शुध्दलेखनाचा सराव  ड) आरोग्य

vii) काव्याचे शेवटचे न्यायासन कोणते?

अ) न्यायाधीश  ब) वकील

क) जनता  ड) राजा

viii) 'सेनापती' पदाची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी नवरदेव आपल्या पत्नीचे नाव काय ठेवतो?

अ) महाराणी  ब) राजकुंवर

क) सेना  ड) वासंती

ix) चार्ली चाप्लीन या नटाच्या विनोदी चित्रपटातील विनोद कोणत्या स्वरूपाचे होते?

अ) शाब्दिक विनोद  ब) स्वभावनिष्ठ विनोद

क) प्रसंगनिष्ठ विनोद  ड) अर्थशून्य विनोद

x) 'अर्धसत्य' चित्रपटात 'ज्योत्स्ना गोखले' ही व्यक्तिरेखा साकारणारी अभिनेत्री कोण?

अ) शबाना आझमी  ब) दिप्ती नवल

क) स्मिता पाटील  ड) सुप्रिया पाठक

प्र.2) 'कविता म्हणजे नेमकं काय असतं?' या पाठात चंद्रकांत पाटील यांनी कवितेचे कोणते विशेष सांगितले आहेत? [10]

किंवा

साहित्य आणि संस्कृती यांच्यातील परस्परसंबंधाचे सविस्तर विवेचन करा.

प्र.3) 'विनोदाची जातकुळी' या पाठाच्या आधारे विनोदाचे स्वरूप आणि प्रकार विशद करा. [10]

किंवा

'शूटींग' या पाठाच्या आधारे चित्रिकरणातील बारकावे आणि विशेष थोडक्यात सांगा.

प्र.4) टिपा लिहा. (कोणत्याही दोन) [10]

अ) ग्रामीण संवेदनशीलता

ब) साहित्यभाषा

क) 'बाप्पा' कथेची जडणघडण

प्र.5) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. [10]

अ) प्रसारमाध्यमे तारक की मारक?

ब) माझा आवडता खेळाडू

⊖⊖⊖